परिवहन समितीच्या सभा, सोमवार दि. २६/०८/२०१९ रोजी दुपारी ०३:०० वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

**उपस्थित सदस्य**

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| 1 | **मा. श्री. जितेंद्र धनराज कुकडे** | **सभापती** |
| 2 | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | **सदस्या** |
| 3 | मा. सौ. मनिषा आशिष धावडे | **सदस्या** |
| 4 | मा. सौ. वैशाली देवचंद रोहणकर | **सदस्या** |
| 5 | मा. श्री. नितीन रामभाऊ साठवणे | **सदस्य** |
| 6 | मा. श्री.राजेश श्रावणजी घोडपागे | **सदस्य** |
| 7 | मा. सौ. रुपा शेखर रॉय | **सदस्या** |
| 8 | मा. सौ. विशाखा शरद बान्ते | **सदस्या** |
| 9 | मा. श्री. नरेंद्र नत्थुजी वालदे | **सदस्य** |
| 10 | मा. सौ. रुपाली प्रशांतसिंह ठाकुर | **सदस्या** |
| 11 | मा. श्री. नागेश महादेव मानकर | **सदस्य** |

**अनुपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| 1 | **मा. श्री. प्रदीप वसंतराव पोहाणे**<br>**सभापती स्थायी समिती – पदेन सदस्य** | **सदस्य** |
| 2 | मा. श्री. नितीश गंगाप्रसाद ग्वालबंशी | **सदस्य** |

**उपस्थित अधिकारी**

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| 1 | **श्री. राजेश मोहिते** | **परिवहन व्यवस्थापक** |
| 2 | **श्री. हरिश दुबे** | **निगम सचिव** |

मा.सभापती, परिवहन समितीच्या सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक ३** :– परिवहन विभाग मनपाचे आर्थिक वर्ष २०१८–१९ मध्ये मनपा निधीतून रु. १०८ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून NMC The City of Nagpur Transport Fund या बॅक ऑफ महाराष्ट्र, सिव्हिल लाईन्स, नागपूरच्या Current Account मध्ये सुरवातीच्या शिल्लकेसह माहे फेब्रुवारी २०१९ रु.५,०७,४१,७४७/– तिकीट विक्रीचा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी फेब्रुवारी २०१९ ला एकूण रु. १३,५८,१६,९४०/– हा विविध लेखा शिर्षाअंतर्गत खर्च झाला आहे.

या खर्चाचा लेखा जोखा परिवहन समिती समक्ष सादर करुन व मान्यता प्राप्त करुन कार्योत्तर वित्तिय मान्यता घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवुन त्यास एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक ४</u>** :— परिवहन समिती मनपाचे आर्थिक वर्ष २०१८—१९ मध्ये मनपा निधीतून रु.१०८ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून NMC The City of Nagpur Transport Fund या बॅक ऑफ महाराष्ट्र, सिव्हिल लाईन्स, नागपूरच्या Current Account मध्ये सुरवातीची शिल्लकीसह मार्च माहे २०१९ ला रु. ५,२४,२६,१११.६०/— तिकीट विक्रीचा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी माहे मार्च २०१९ ला एकूण रु. १४,७१,७०,१४१/— हा विविध लेखा शिर्षाअंतर्गत खर्च झाला आहे.

या खर्चाचा लेखा जोखा परिवहन समिती समक्ष सादर करुन कार्योत्तर वित्तिय मान्यता घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवुन त्यास एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक ५</u>** :— परिवहन समिती मनपाचे आर्थिक वर्ष २०१९—२० मध्ये मनपा निधीतून रु. १०८ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून NMC The City of Nagpur Transport Fund या बॅक ऑफ महाराष्ट्र, सिव्हिल लाईन्स, नागपूरच्या Current Account मध्ये सुरवातीची शिल्लकीसह माहे एप्रिल २०१९ ला रु. ५,२१,८४,३१६.६०/— तिकीट विक्रीचा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी माहे एप्रिल २०१९ ला एकूण रु. १०,७६,७२,४३९/— हा विविध लेखा शिर्षाअंतर्गत खर्च झाला आहे.

या खर्चाचा लेखा जोखा परिवहन समिती समक्ष सादर करुन कार्योत्तर वित्तिय मान्यता घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवुन त्यास एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक ६</u>** :— परिवहन समिती मनपाचे आर्थिक वर्ष २०१९—२० मध्ये मनपा निधीतून रु.१०८ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून NMC The City of Nagpur Transport Fund या बॅक ऑफ महाराष्ट्र,सिव्हिल लाईन्स, नागपूरच्या Current Account मध्ये सुरवातीची शिल्लकीसह माहे मे २०१९ ला रु. ५,३३,७७,००९.९०/— तिकीट विक्रीचा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी माहे मे २०१९ ला एकूण रु. १२,८०,२४,०५३/— हा विविध लेखा शिर्षाअंतर्गत खर्च झाला आहे.

या खर्चाचा लेखा जोखा परिवहन समिती समक्ष सादर करुन कार्योत्तर वित्तिय मान्यता घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवुन त्यास एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक ७</u>** :— परिवहन विभाग मनपाचे आर्थिक वर्ष २०१९—२० मध्ये मनपा निधीतून रु.१०८ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून NMC The City of Nagpur Transport Fund या बॅक ऑफ महाराष्ट्र, सिव्हिल लाईन्स, नागपूरच्या Current Account मध्ये सुरवातीच्या शिल्लकेसह माहे जून २०१९ रु. ५,००,१३,२२०.९०/— तिकीट विक्रीचा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी जून २०१९ ला एकूण रु. ९,२७,५७,३२६/— हा विविध लेखा शिर्षाअंतर्गत खर्च झाला आहे.

या खर्चाचा लेखा जोखा परिवहन समिती समक्ष सादर करुन व मान्यता प्राप्त करुन कार्योत्तर वित्तिय मान्यता घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवुन त्यास एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक ८</u>** :— मनपा परिवहन समिती ठराव क्र. ३३, दि. १६/१२/२०१७ अन्वये समितीतील ०३ सदस्यांची उपसमिती व्ही.एन.आय.एल. च्या भंगार बसेस विकण्याकरीता गठीत करण्यात आली होती. दि. २७/०५/२०१९ अन्वये दि. २७/०५/२०१९ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मा. सदस्य, श्री. प्रविणजी भिसीकर, अध्यक्ष उपसमिती हे निवृत्त झाल्यामुळे नविन उपसमिती गठीत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवुन या ऐवजी संपुर्ण अधिकार मा. सभापती श्री. जितेंद्र धनराज कुकडे, यांना देण्यास समितीने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक ९** :— उत्तर नागपूर येथे शहर बस डेपोकरीता मौजा, वांजरा खसरा क्र. ५८/४ येथील ६,००० चौ.मी. जागा मे. स्पॅन ईटरप्रायजेस यांचे कडून माहे. ऑक्टोबर २०१८ पासुन भाडे तत्वावर घेतलेली होती. त्या जागेचा मे. आर.के. सिटी बस ऑपरेशन प्रा. लि. यांना ताबा घेण्याविषयी सुचित करण्यात येवूनही त्यांनी जागेचा ताबा न घेतल्याने व या जागेच्या आवश्यकतेबाबत केलेला करारनामा याबाबत तपासणी करून सादर तपासणी अहवालानुसार मे. स्पॅन इंटरप्रायजेस यांना अदा करण्यात आलेली भाडयाची रक्कम रू. ४,२७,७०३/— ही मे. आर.के. सिटी बस ऑपरेशन प्रा. लि. यांचे देयकातुन कपात करणे व माहे. ऑक्टोबर २०१८ ते पुढील कालावधीचे भुगतान व त्या रक्कमेची वसुली करणे, तसेच हया जागेचे भाडे तत्वावर झालेला करारनामा दि. ३१/०५/२०१९ पासुन रदद् करण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेवुन मे. स्पॅन इंटरप्रायजेस यांना माहे ऑक्टोंबर २०१८ ते मे २०१९ पर्यंतचे भाडे देण्यात यावे व हे भाडे वसुल करण्याबाबतचा विषय पुढील सभे समोर ठेवण्यात यावे यास एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक १०** :— परिवहन विभागात कामाकरीता श्री. सुकीर सोनटक्के, वाहतुक व्यवस्थापक म्हणून नियुक्त असुन त्यांना दि. १०/०४/२०१९ ते दि. ०९/१०/२०१९ पर्यंत सहा महिन्यांचे कालावधी करीता दरमाह रू. ३५,०००/— या मानधन तत्वावर लोकसभा आचार संहीता लक्षात घेता, मा. आयुक्त यांनी दि. ३०/०४/२०१९ रोजी प्रदान केलेली मान्यता लक्षात घेता व त्यांना पुढील सहा महिन्याचे कालावधी करीता म्हणजेच दि. १०/०४/२०१९ ते दि. ०९/१०/२०१९ पर्यंत तसेच, या पुढील सहा महिने करिता उपरोक्त नमुद मानधन तत्वावर नियुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवुन त्यास एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक ११** :— परिवहन विभागात कामाकरीता श्री. रामराव मातकर, पर्यवेक्षक (अतांत्रिक) म्हणून नियुक्त असुन त्यांना दि. १०/०४/२०१९ ते दि. ०९/१०/२०१९ पर्यंत सहा महिन्यांचे कालावधी करीता दरमाह रू. २२,०००/— या मानधन तत्वावर लोकसभा आचार संहीता लक्षात घेता, मा. आयुक्त यांनी दि. ३०/०४/२०१९ रोजी प्रदान केलेली मान्यता लक्षात घेता व त्यांना पुढील सहा महिन्याचे कालावधी करीता म्हणजेच दि. १०/०४/२०१९ ते दि. ०९/१०/२०१९ पर्यंत तसेच, या पुढील सहा महिने करिता उपरोक्त नमुद मानधन तत्वावर नियुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवुन त्यास एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक १२** :— परिवहन विभागात कामाकरीता श्री. अरूण पिपरूडे, कामगार अधिकारी व जन संपर्क अधिकारी म्हणून नियुक्त असुन त्यांना दि. ०९/०४/२०१९ ते दि. ०८/१०/२०१९ पर्यंत सहा महिन्यांचे कालावधी करीता दरमाह रू. ३५,०००/— या मानधन तत्वावर लोकसभा आचार संहीता लक्षात घेता, मा. आयुक्त यांनी दि. ३०/०४/२०१९ रोजी प्रदान केलेली मान्यता लक्षात घेता व त्यांना पुढील सहा महिन्याचे कालावधी करीता म्हणजेच दि. ०९/०४/२०१९ ते दि. ०८/१०/२०१९ पर्यंत तसेच, या पुढील सहा महिने करिता उपरोक्त नमुद मानधन तत्वावर नियुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवुन त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक १३</u>** :— परिवहन विभागात लेखाविषयक विविध कामाकरीता श्री. विनय भारद्वाज, लेखा अधिकारी म्हणून नियुक्त असुन त्यांना दि. ०९/०३/२०१९ ते दि. ०८/०९/२०१९ पर्यंत सहा महिन्यांचे कालावधी करीता दरमाह रू. २२,०००/— या मानधन तत्वावर लोकसभा आचार संहीता लक्षात घेता, मा. आयुक्त यांनी दि. ३०/०४/२०१९ रोजी प्रदान केलेली मान्यता लक्षात घेता व त्यांना पुढील सहा महिन्याचे कालावधी करीता म्हणजेच दि. ०९/०३/२०१९ ते दि. ०८/०९/२०१९ पर्यंत तसेच, या पुढील सहा महिने करिता उपरोक्त नमुद मानधन तत्वावर नियुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवुन त्यास एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक १४</u>** :— परिवहन विभागात लेखाविषयक विविध कामाकरीता श्री. अश्विन पाचपौर, सहा. लेखापल म्हणून नियुक्त असुन त्यांना दि. १६/०४/२०१९ ते दि. १५/१०/२०१९ पर्यंत सहा महिन्यांचे कालावधी करीता दरमाह रू. २०,०००/— या मानधन तत्वावर लोकसभा आचार संहीता लक्षात घेता, मा. आयुक्त यांनी दि. ३०/०४/२०१९ रोजी प्रदान केलेली मान्यता लक्षात घेता व त्यांना पुढील सहा महिन्याचे कालावधी करीता म्हणजेच दि. १६/०४/२०१९ ते दि. १५/१०/२०१९ पर्यंत तसेच, या पुढील सहा महिने करिता उपरोक्त नमुद मानधन तत्वावर नियुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवुन त्यासएकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक १५</u>** :— मार्ग तपासणीक पदाची निमीर्ती महाराष्ट्र महानगरपालिका कलम क्र. ३४८ व ३४९ अन्वये कंत्राटी पध्दतीवर प्रथमत: सहा महिन्याचे कालावधी करीता श्री. गिरीष महाजन यांची नेमणुक करण्यास तसेच यांना रू. २०,०००/— + रू. ३,०००/— मानधन देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवुन त्यास एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक १६</u>** :— परिवहन विभागात शासन निणर्य दि. १७/१२/२०१६ तसेच ठराव क्र. २४, दि. १७/१०/२०१७ अन्वये श्री. रविंद्र पागे, मनुषबळ विकास तसेच प्रशासकीय अधिकारी, श्री. केदार मिश्रा, कार्यकारी/उप—अभियंता व श्रीमती. संध्या ठोंबरे, स्टेनोग्राफर म्हणून नियुक्ती करण्यात आली होती व शासन निर्णयाध्ये ०१ वर्षाकरीता नेमणुकीची अट असल्याने त्यांचा कालावधी दि. ३१/०८/२०१९ ला संपुष्टात येत आहे. सदर कर्मचाऱ्यांनी या अवधीत आपले कामकाज उत्तमपणे सांभाळला असल्याने त्यांना पुढील ०१ वर्षाकरीता दि. ०१/०८/२०१९ ते ३१/०७/२०२० मुदतवाढ देण्याचा प्रश्न तसेच परिवहन समितीच्या मान्यते अन्वये मानधन देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवुन परिवहन समितीचा मागील ठरा. २४ दिनांक १७.१०.२०१७ नुसार जे मानधन सध्या श्री. पागे, श्री. मिश्रा व श्रीमती. ठोंबरे यांना देण्यात येत आहे. त्याच मानधनावर यापुढे काम करण्याची मुभा असुन शासन निर्णयानुसार वेतनमान देणे शक्य होणार नाही. जर श्रीमती ठोंबरे हे परिवहन समितीच्या ठरावानुसार नमुद मानधनावर पुढे काम करावयास तयार असतील तर त्यांना नियुक्ती देण्यात यावी. या मा.सभापती यांनी केलेल्या सुचनेस समितीने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक १७</u>** :— मा. सदस्य परिवहन समिती यांचे दि. ०४/०७/२०१९ चे परिवहन समितीस दिलेल्या पत्राचे अवलोकन व्हावे. यामध्ये त्यांनी नमुद केले की, नागपूर शहरबस सेवेच्या माध्यमातुन उत्पन्न व रहदारी सुरळीत होण्याच्या दृष्टीने खाजगी बस सेवा राबविणाऱ्या खाजगी बस कंपन्याना शहर हहद्दीबाहेर थांबा देवून शहरात येण्यास प्रतिबंध लावून ‘‘आपली बस’’ सेवा या थांब्या पासुन सुरू करण्यात यावे. देशातील अनेक मोठया शहरात बाहेर गावावरून येणाऱ्या खाजगी बसेसला मनाई असून शहरबस सेवेच्या माध्यमातुनच कार्य होत आहे. त्यामुळे त्या—त्या शहरात उत्पन्न वाढवुन वाहतुक सुरळीत होण्याबाबत चा प्रश्न समितीने विचारात घेवून हा विषय कार्यालयास परत करण्यात येते या मा.सभापती यांनी सुचित केल्याप्रमाणे विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक १८</u>** :— नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या २३७ स्टॅन्डर्ड डिझेल बसेस सी.एन.जी. इंधनावर परावर्तीत करण्याकरीता वाडी जुना ऑक्ट्राय नाका येथील जागेत सी.एन.जी. फ्युल स्टेशन व फ्युल डिसपेन्सीग फॅसिलीटी देण्याकरीता प्रशासकीय मान्यता प्राप्त करण्यात आलेली आहे व २३७ बसेसचे सी.एन.जी. किटफिटमेन्ट करीता तसेच त्यापुढील कालावधीतील सी.एन.जी. किट व संबंधीत यांत्रिकी दुरूती व देखभाली यासाठी कार्यशाळेकरीता जागा उपलब्ध करून देण्याची मागणी मे रॉ मॅट इन्डस्ट्रीज प्रा. लि. यांनी केलेली आहे.

त्यापुर्वी त्यांना फ्युल स्टेशन व फ्युल डिसपेन्सींग युनिट करीता १०५० चौ. मी. जागा व सी.एन.जी. देखभाल दुरूस्ती कार्यशाळा करीता८१० चौ.मी. जागा अशी एकूण १८६० चौ.मी. खापरी डेपोतील मासिक परवाना शुल्क रू. ३००३२ + जी.एस.टी. प्रमाणे प्रथम ५ वर्षाकरीता व नंतर ४ वर्षाची मुदतवाढ प्रमाणे देण्यास परिवहन समिती तर्फे ठराव क्र. ४९, दि. ३१/०५/२०१९ ला मंजुरी मिळाली आहे.

मे. रॉ—मॅट इन्डस्ट्रीज प्रा.लि. यांनी नविन सुधारीत प्रस्ताव सादर केलेला आहे. हया प्रस्तावात खापरी जागेत फक्त फ्युल स्टेशन व फ्युल डिसपेन्सींग युनिट असल्याचे व देखभाल व दुरूस्ती कार्यशाळा खापरी तुन वाडी येथील जुने ऑक्ट्राय नाक्याची रिकामी जागेत स्थालांतरीत करण्याचे प्रस्तावित केले आहे. वाडी जुना ऑक्ट्राय नाक्याचे जागेत

१. फ्युल स्टेशन व फ्युल डिसपेन्सीग फॅसिलीटी करीता १२०० चौ.मि. जागा व सी.एन. जी. देखभाल दुरूस्ती कार्यशाळा करीता ५४० चौ.मि. जागा मे रॉ मॅट इन्डस्ट्रीज प्रा. लि. यांना उपलब्ध करून देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

२. एकूण १७४० चौ.मी. जागेचे मासिक परवाना शुल्क रेडी रिकनेर प्रमाणे ३३२०० × १७४० ×१/१२ ×२.५ / १०० = रू. १,२०,३५०/— प्रतिमाह व खापरी जागेचे रू. ३००३२/— असे एकूण परवाना शुल्क रू. १,५०,३८२/— + जी.एस.टी. प्रतिमाह प्रमाणे मनपास जमा कराव्याचा प्रश्न विचारात घेणे.

३. सदर जागेची उपलब्धतेचा कालावधी ०५ वर्षाकरीता निश्चित करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

४. मनपा मालकीच्या २३७ स्टॅंडर्ड डिझेल बसेस सी.एन.जी. ची कीट लावून सी.एन.जी. इंधनावर परावर्तीत करणे या क्र १ ते ४ प्रश्न समितीने विचारात घेवुन त्यास एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक १९ :—** ‘‘आपली बस’’ वर जाहिराती लावण्याकरीता दि. २६/०३/२०१९ ला झालेल्या स्टेअरींग कमेटीच्या बैठकीत आय.डी.एफ.सी. बॅकेचे प्रतिनिधी उपस्थित होते व त्यांनी ई—ऑक्शन बाबत संपुर्ण माहिती दिली असता मा. आयुक्त यांनी ई—ऑक्शन द्वारे जाहीरातीचे हक्क कंत्राटदारास देण्याबाबत निर्देश दिले. या बैठकीच्या अनुषंगाने आय.डी.एफ.सी. बॅंकेसोबत पत्र व्यवहार केला व त्यांनी आपला अहवाल सादर केला. त्यांचे मार्फत ई—ऑक्शन केल्यास मनपाला कोणताही खर्च येणार नसुन संपुर्ण प्रक्रिया पारदर्शक राहणार आहे. ई—ऑक्शन आय.डी.एफ.सी. बॅके मार्फत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवुन त्यास मा. आयुक्त यांना अधिकार देण्यास एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक २०:—** आजच्या सभेची कार्यवाही कायम करुन सभा अनिश्चित काळाकरीता स्थगीत करण्यात आली.

**निगम सचिव**
**ना.म.पा. नागपूर**

**सभापती**
**परिवहन समिती**